ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

# बंजारा समाजाची आर्थिक स्थिती

**दिपक कोलू वळवी**

एस.पी.डी.एम. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय- शिरपूर

**प्रस्तावना :**

समाजशास्त्रात आर्थिक जीवन पद्धती अतिशय महत्त्वाची समजली जाते. सच्चिदानंद यांनी म्हटल्याप्रमाणे "एखाद्या गटाची सामाजिक स्थिती ही त्याच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते." बंजारा समाजाचे अर्थार्जन प्राचीन काळापासून जंगल, डोंगराळ, दुर्गम भाग आणि काही प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे, पूर्वीपासून मीठ, अन्नधान्य, जडजवाहिर व अन्य वस्तूंची आयात निर्यात व काही प्रमाणात व्यापार करणारा हा समाज ओळखला जातो. प्राचीन काळापासून ते १८ व्या शतकापर्यंत हा समाज वैभवशाली समाज म्हणून ओळखला जात असे. रसद पुरविण्याचा पारंपारिक व्यवसाय ब्रिटिशांनी रेल्वे आणल्यामुळे नष्ट झाला. तेव्हा बंजारानी इतर व्यवसाय करणे जसे गोंणपाट तयार करणे, गोणी तयार करून विकणे, दारू गाळणे इ. व्यवसाय करण्यास सुरुवात केली. सोबतच जंगलात जाऊन डिंक मध गोळा करणे हा व्यवसाय स्वीकारला. आज हा समाज स्वतःच्या आर्थिक उदरनिर्वासाठी गाव सोडून इतर ठिकाणी कामासाठी जात आहे. एकेकाळी कणखर असलेला समाज आज बदलत्या परिस्थितीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनला आहे.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**उद्देश :-**

१. बंजारा समाजाचा इतिहास समजून घेणे.

२. बंजारा समाजाच्या आर्थिक जीवनशैलीचा अभ्यास करणे.

३.बंजारा समाजाच्या विविध उद्योगधंद्यांची माहिती मिळविणे.

**गृहीतके :-**

१. बंजारा समाजात लदेणी हा पारंपारिक व्यवसाय होता.

२. बंजारा समाजाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही..

३. बंजारा समाजातील पारंपारिक उद्योग व्यवसाय स्थलांतरित स्वरूपाचे होते.

४. इंग्रजांच्या आगमनानंतर बंजारा समाजाच्या व्यापारावर बंधने आली.

**विषय विवेचन :-**

बंजारा समाजाचा लदेणीचा पारंपारिक व्यवसाय नष्ट झाल्यानंतर बंजारा समाज स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी खालील दुय्यम व्यवसायाकडे वळला.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

**१. पशुपालन व्यवसाय :-**

व्यापार व परिवहन नंतर बंजारा समाजाचा मुख्य व्यवसाय पशुपालन, गाई-गुरे चारणे हा ठरला. मोठ्या प्रमाणावर जंगलात राहण्याचा या समाजाचा उद्देश गाईगुरे चारणे हा होता. लाखा बंजारा व जंगी -भंगी यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पशुधन असल्याचे उल्लेख मिळतात. परवानगी घेतल्याशिवाय कुणाच्याही जमिनीत बंजारा लोक गुरे चारत नसत. बैलांच्या खरेदी विक्री करण्याचा व्यवसाय बंजारा समाज मोठ्या प्रमाणावर करीत असत. पशूंच्या उदरनिर्वाहासाठी पठार असलेल्या ठिकाणीच त्यांनी आपली वस्ती केली. गाई बैलांचे मोठमोठे कळप असूनही दुधाचा व्यवसाय करण्याची प्रथा बंजारा समाजात नव्हती. तूप तयार करून ते त्याची विक्री करीत असत.

**२. सुतकताई करणे :-**

बंजारे लोक गाई बैलांना चारण्यासाठी जंगलात घेऊन जात. त्याठिकाणी मिळालेल्या फावल्या वेळेत सूतकताई करून ते गोणपाट तयार करीत असत . तागाच्या धाग्यापासून गोणी म्हणजे गुणी, धडकी वखरा, सापत्या अशा वस्तू तयार करण्याचा प्रघात होता. ३२ ढेऱ्याची एक गोणपाट तयार होत असे. गोणपाट तयार करणे हे अतिशय कष्टाचे काम होते. सूतकताई करून स्वच्छ पाण्याने धुवून नंतर कताई यंत्रावर पुरुष गोणी तयार करतात. आजही अनेक तांड्यांवर गोणपाट विणण्याचे काम चालते. विवाहाच्या प्रसंगी मुलगी बैलाच्या पाठीवर गोणी टाकून वडिलांच्या घराकडे तोंड करून बैलावर उभे राहून हवेली हे आशीर्वादपर गीत म्हणत असते.

**३. कशिदाकारी :-**

बंजारा स्त्रियांच्या मते सुईने कापडावर निरनिराळ्या धाग्यांनी विविध टाके घालून आकर्षक रंगसंगती साधून तयार केलेली वस्त्रे वस्तू किंवा कलाकृती म्हणजे काशीदाकारी होय. डॉ. पवार लिहितात "कापडावरील सुते मोजून चारच्या पटीत धाग्याच्या साहाय्याने चौकोणी किंवा आयताकार फुले तयार करून ते जवळजवळ घातलेल्या टाक्याने भरून काढतात त्यामुळे कपड्यावरील सुते उलट बाजूने दिसत नाहीत. बंजारा स्त्री कापडावर कशिदाकारी व भरतकाम तर पुरुष गोणपाटावर भरत भरतात." बंजारा

स्त्रिया कशिदाकारीमध्ये स्वभावतः संपूर्ण निपुण होत्या. कशिदाकारी कलाकृती ही घागरा ,बटवा, काचडी, पिशवी, मंडाव, तंबाखूपिशवी, नायकाची पिशवी इत्यादीवर काढलेली असे. बंजारा समाजाची कशिदाकारी भारतातच नव्हे तर विदेशात ही प्रसिद्ध होती. याबाबत डॉ. शर्मा लिहितात "बंजारों की कसिदाकारी भारत में ही नही विदेश में भी प्रशंसा प्राप्त कर चुकी है| समृद्ध परिवारो की महिलाए बंजारा शैली की चोलिया ओढणी तथा लहंगे पसंत करती है| बडे शहर और कसबोमे कुछ बनजरीने कसिदाकारीसे जीविका उपर्जित करने लगी है"|

**४. दारू गाळणे :-**

बंजारा समाजात दारूचा व्यवसाय करणारे अनेक लोक आहेत. परंतु इतर व्यवसायाप्रमाणे दारू व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही. जंगलात मोहाची झाडे मोठ्या प्रमाणावर असतात. या झाडाच्या फुलांपासून बंजारानी दारू गाळण्यास प्रारंभ केला. दारू प्रक्रियेसाठी मोहाची

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

फुले, गुळ, नवसागर इ. साहित्य लागते. या दारूला हातभट्टी असेही म्हणतात. या दारूमध्ये तीन प्रकार असतात पहिल्या धारेची, दुसऱ्या धारेची आणि तिसऱ्या धारेची दारू. बंजाराना कोणत्याही प्रकारचे दारू गाळण्याचे परवाने शासन देत नाही. चोरूनच दारूही गाळली जाते. गावामध्ये किंवा तांड्यात सण- उत्सव असेल त्याप्रसंगी मोठ्या प्रमाणात दारूची विक्री होते. अनेक तांड्यांवर पोलिसांच्या धाडी पडतात. तेव्हा पुरुष मंडळी जंगलात पळून जाते. तर पोलिसांशी सामना बंजारा स्त्रिया करतात. दारू गळण्याच्या व्यवसायावर अनेक बंजारा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. बंजारा समाजात मद्य तयार करण्याच्या प्रक्रियेला “भट्टी लगाडणो” असे म्हणतात.

**५ . डिंक व मध गोळा करणे :-**

बंजारा समाजातील अनेक स्त्री-पुरुष जंगलात डिंक वेचण्याचे काम करतात. डिंकाला बंजारा भाषेत गुंद असे म्हणतात. धामुड्याचा डिंक सर्वोत्तम असतो. याव्यतिरिक्त बाभळ, खैर, लिंब,पळस इ. झाडाची डिंक गोळा करण्याचा व्यवसाय करतात. डिंकाला शहरात बऱ्यापैकी मागणी असते. मध हा देखील बंजारा समाजातील स्त्री-पुरुष व लहान मुले यांचा व्यवसाय बनला आहे. मधाचे देखील विविध प्रकार आहेत आग्या मोहोळ, खोत्या मोहोळ, साधा मोहोळ इत्यादी प्रकार आढळतात. मध काढण्याची कला ही बंजारा गणाकडे असते. कोणत्या वेळी काढावेवे, कोणत्या दिवसात भरलेले असते याचे ज्ञान बंजारा स्त्री-पुरुषांकडे असते. योग्यवेळी मध काढून त्याची विक्री शहर किंवा गावात केली जाते. मध व डिंक हे बंजारा समाजात चवीने खाल्ले जाते.

**६. शेती व्यवसाय :-**

औद्योगीकरण, नागरिकरण यांच्या वाढत्या विकासामुळे बंजारा समाजातील परंपरागत व्यापारी वृत्ती कमी झालेली आहे. स्थायी जीवन जगत असताना शेती व्यवसायाकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले. प्रथम जमीनदारांची शेती आपल्या गाई बैलांच्या साह्याने करू लागले. स्वतःच्या मालकीची शेती नव्हती कालांतराने पैशांची बचत करण्याची कौशल्य त्यांच्यात निर्माण झाले. पुढे शेतमजुरांचे रूपांतर शेतमालकात झाले. शेती ही माळरानाची हलक्या प्रतीची असते. त्यामुळे आर्थिक परिस्थितीला पोषक असे उत्पन्न शेतीमधून निघत नाही. बाजरी ,मटकी, मूग, भगर, नाचणी, तूर इ. धान्य घेतले जाते धान्याला बाजारात नगण्य किंमत असते.

**निष्कर्ष :-**

बंजारा समाज हा संपूर्ण भारतात पसरलेला दुर्लक्षित समाज आहे. एकविसाव्या शतकात देशाची व्यापक प्रगती झालेली असली तरी बंजारा समाजातील दारिद्र्य नष्ट झाले नाही. हा समाज विविध प्रांतात, शहरात कामासाठी भटकंती करतो. काम संपले की तेथेही मुक्काम संपतो. पोटासाठी पुन्हा नव्या कामाच्या शोधात हा समाज भटकत असतो. सतत भटकंती असल्यामुळे मुलांची शिक्षण होत नाही. पोटासाठी फक्त काबाडकष्ट करायचे आणि मिळेल ते दाम स्वीकारायचे इतके मर्यादित त्यांचे जगणे आहे. कामाची शाश्वती, फंड, निर्वाह निधी आणि पगारी रजा या गोष्टी तर त्यांच्यापासून कित्येक मैल दूर आहेत. अधिक कष्टाचे काम, ऊसतोड, विहीर फोडणे, बांधकाम इ. कामे बंजारा समाज सध्या करीत आहे .बंजारा

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

समाजात आधुनिक दृष्टीकोणाचा अभाव, यंत्राचा अभाव यामुळे उत्पादन अधिक निघत नाही. वाढत्या कुटुंबामुळे शेतकऱ्याचे रूपांतर भूमिहीन शेतकऱ्यात झाले आहे. आज त्यांच्या प्राथमिक गरजा ही भागविल्या जात नाहीत. यातून त्यांना आर्थिक गुलामी करावी लागते. त्यातूनच बेकारी, व्यसनाधीनता, निकृष्ट दर्जाच्या आरोग्य इ. समस्या उद्भवतात

**संदर्भसूची :-**

१) राठोड आत्माराम कानिराम – गोर बंजारा इतिहास व लोकजीवन, गोरवट प्रकाशन, यवतमाळ, १९९४

२) चव्हाण रामनाथ – भटक्या विमुक्तांचे अंतरंग , सुगावा प्रकाशन, पुणे, १९९८

३) प्रा. डॉ. सुनील राठोड – बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते, मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे, २०१२

४) राठोड मोतीराज – गोरमाटी, बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद, औरंगाबाद, १९९८

५) जाधव डॉ. यशवंत – बंजारा जाती-समाज और संस्कृती, वाणी प्रकाशन,नई दिल्ली, १९९२

६) मोतीचान्द्र – सार्थवाह, साहित्य अकादमी,नवी दिल्ली, २०१०

७) जाधव सरीचन्द्र – साथी बंजारा (साप्ताहिक),चाळीसगाव, दिवाळी विशेषांक, १९९६

*Cite this Article:*

Valavi D.K. (2023). BANJARA SAMAJACHI AARTHIK STHITI. In Electronic International Interdisciplinary Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 337–360). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10464712